# शासकीय विभागांतर्गत योजना व लाभ मिळण्याची कार्यपध्दती
# विभाग :- औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, मुंबई

| उपविभाग/प्रभाग | योजना क्र. | योजना | उद्येश | नेमका काय फायदा होईल | योजनेचा लाभ मिळविण्याची कार्यपध्दती व कागदपत्रे | कोणाशी संपर्क करावा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई | १ | **केमसेफटी** (CHEMSAFETY) या विषयावर सुरक्षाविषयक प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन | धोकादायक/ रायायनिक कारखान्यातील कामगाराची सुरक्षितता | कारखान्यात काम करताना होणारे अपघात कमी होऊन जीवीत व वित्त हानी कमी होईल. | सविस्तर माहिती सोबत जोडली आहे. | श्री.वि.वि.काटमवार. उप संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य,रायगड |

योजनेचा लाभ मिळविण्याची कार्यपध्दती व कागदपत्रे

औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय व कै.नारायण मेघाजी लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था,परेल,मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील नोंदणीकृत रायायनिक कारखान्यांतील ऑपरेटर्स/सुपरवायझर्स यांचेकरीता " CHEMSAFETY " या विषयावर कै.नारायण मेघाजी लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था,परेल,मुंबई येथे प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तीस-या आठवडयामध्ये तीन दिवसीय सुरक्षा विषयक प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात येते. प्रशिक्षण कार्यशाळेच्या तारखा औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय व कै.नारायण मेघाजी लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था,परेल,मुंबई यांच्या समन्वयाने निश्चित केल्या जातात. त्यानंतर सदर प्रशिक्षण कार्यशाळेबाबतची माहिती वेळापत्रकासह औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाच्या www.mahadish.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिली जाते.

त्यानुसार सदर कार्यशाळेमध्ये भाग घेण्याकरीता कारखान्याच्या भोगवटादार/व्यवस्थापनाने त्यांच्या कारखान्यातील ऑपरेटर्स/सुपरवायझर्स यांची सदर प्रशिक्षणासाठी कै.नारायण मेघाजी लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था,परेल,मुंबई यांचेकडे नावनोंदणी करणे आवश्यक आहे. सदर प्रशिक्षणाचे शुल्क हे प्रति व्यक्ती रु.३,५००/- इतके आहे. सदर शुल्क कै.नारायण मेघाजी लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था,परेल,मुंबई यांच्या खाली दिलेल्या बँक खात्यामध्ये NEFT/RTGS द्वारे प्रशिक्षण कार्यशाळा सुरु होण्यापुर्वी किमान २ दिवस आधी जमा करणे आवश्यक आहे. तसेच सदर प्रशिक्षणाकरीता किमान २५ प्रशिक्षणार्थीनी नावनोंदणी करणे आवश्यक असते. सदर प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर प्रत्येक प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्राचे वितरण करण्यात येते.

कै.नारायण मेघाजी लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था,परेल,मुंबई यांच्या बँक खात्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

1. Account Name : Certification Training Programme MILS
2. Account No. : 60332739264.
3. Bank Name : Bank Of Maharashtra
4. Branch Name : Parel, Mumbai
5. IFSC Code : MAHB00079